महाराष्ट्र पोलीस

# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र



०७१८४ - २५४७०२ sp.bhandara@gov.in / pilcb.bhandara@gov.in

जा.क्र. जनसंपर्क कक्ष/वार्तापत्र/ ५३९/पोलीस अधिक्षक कार्यालय भंडारा, दिनांक:- ०५/१०/२०१८?

## गोधनाची अवैध वाहतुक करणारा ट्रक व महिन्द्रा बोलेरो पिकअप गाडी पकडली, ४ अटकेत

## भंडारा जिल्हा पोलीसांची कार्यवाही

**पोलीस ठाणे लाखनी व अडयाळ** :–दिनांक ४/१०/२०१८ रोजी पोलीस अधीक्षक भंडारा विनीता साहू व अपर पोलीस अधीक्षक रश्मी नांदेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन लाखनीचे ठाणेदार दामोदर मंडलवार व सहकारी पोलीस शिपाई मयुर सिंगनजुडे, पोलीस हवालदार थेर पोलीस हवालदार हेमके यांनी वेळीच सर्तकता दाखवुन शिताफिने नाकांबंदी दरम्यान दिनांक ०४५/१०/२०१८ साकोली कडुन एनएच ६ रोडनी तहसिल चौक लाखनीकडे जाणा–या ट्रक क्र. एम.एच.३५के ३९४४ मध्ये अवैधरित्या जनावरांना कोंबुन क्रूरतेने वागवुन वाहतुक करणारा ट्रक पकडला.

ट्रक क्र. एम.एच.३५के ३९४४ मध्ये एकुण २८ जनावरे होती एकुण किंमती २,८०,०००/–रू व ट्रक क्र. किंमती २०,००,०००/रू, असा एकुण किमंती २२,८०,०००/– रू मिळुन आल्याने आरोपीं विरूध्द पोलीस ठाणे लाखनी येथे कलम ११(१)(घ)(ड) प्राण्यांना निर्दयतेने वागविण्याचा कायदा अधि. १९५९ सहकलम ९ प्राणी संरक्षण अधिनियम, सह कलम ९ प्रा. नि. वा. का. १९७६ अन्वये गुन्हा नोंद केला. असुन सर्व गोधन भवानी गौशाला पिंपळगांव सडक येथील गोशाळेत ठेवण्यात आले आहेत. सदर गुन्हयात आरोपी नवसाद इब्राहिम अली सैय्यद वय ३४ वर्षे बुरड मोहल्ला लाखनी यास अटक करण्यात आले आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार भगवान थेर पोलीस स्टेशन लाखनी करीत आहेत.

**पोलीस ठाणे अडयाळ** :– पोलीस अधीक्षक भंडारा विनीता साहू व अपर पोलीस अधीक्षक रश्मी नांदेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन अडयाळ ठाणेदार श्री. सुरेश ढोबळे पोलीस निरीक्षक व सहकारी पोलीस शिपाई मिलींद सखाराम बोरकर वय ३४ वर्ष, पोलीस हवालदार हेमने यांनी वेळीच सर्तकता दाखवुन शिताफिने पेट्रोलींग दरम्यान दिनांक ०४/१०/२०१८ चे २३.३४ अडयाळ कडुन पवनी कडे येणा–या महीन्द्रा बोलेरो पिकअॅप क्र. एमएच ४९ डी– ४३२३ वाहन किंमती ३,५०,०००/–रु. ४ पांढ–या रंगाचे बैल किंमती ८०,०००/–रु. असा एकुण ४,३०,०००/–रु. मिळुन आल्याने आरोपीतांनविरुध्द

पोलीस ठाणे अडयाळ येथे कलम ११(१)(ड) प्रा. छ. प्र. अ. सहकलम ९ महा प्रा. सं. का. सहकलम ११९ मु. पो. का. सहकलम ६६/१९२ ८३/१७७,३/१८१मोवाका अन्वये गुन्हा नोंद केला. सदर गुन्हयात आरोपी १) दिपक राधेश्यामजी कुंभलकर वय २४ वर्ष, रा. माल्ही ता. तिरोडा जि. गोंदिया २) अमीत अभीमन बरेकर वय ३३ वर्ष, रा. सिल्ली ता. तिरोडा जि. गोंदिया ३) राजु पांडूरंग शहारे वय ३० वर्ष, रा. कोडेलोहाटा ता. तिरोडा जिल्हा गोंदिया यांना अटक करण्यात आले आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार सत्यराव हेमने हे करीत आहेत.

(जितेद्रं के आडोळे)
पोलीस उपनिरीक्षक
जनसंपर्क अधिकारी
दुरध्वनी.क्र. ९४०३१०९७२०

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.